हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ **ईमेल:igatpuri.amfu@gmail.com**

६७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.२३.११.२०२६ जिल्हा: नाशिक

मागील आठवड्यातील हवामान (१७/११/२०२६ ते २३/११/२०२६)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२४/११/२०२६ ते २८/११/२०२६)				
१७	१८	१९	२०	२१	२३	२४	दिनांक	२४	२५	२६	२७	२८
०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	पाऊस (मिमी)	०	०	०	०	०
३०.५	३१.०	३०.०	२७.७	२९.२	२९.५	३०.७	कमाल तापमान (अं.से.)	३१	३०	२९	२८	२८
१५.०	१८.०	१९.०	१५.३	१२.३	१४.०	१८.०	किमान तापमान (अं.से.)	१५	१४	१३	१२	१३
निरभ्र	अं:ढगाळ	निरभ्र	निरभ्र	निरभ्र	अं:ढगाळ	अं:ढगाळ	ढग स्थिती (आकाश)	अं:ढगाळ	अं:ढगाळ	अं:ढगाळ	अं:ढगाळ	अं:ढगाळ
६९	६७	६०	५९	६७	६७	६४	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	६८	६७	६६	६२	७२
४३	४३	३७	३०	३४	३७	३२	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	४१	४१	४०	३८	४४
२.३	४.६	७.६	७.३	३.२	३.८	६.१	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	८	८	६	४	६

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश		पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता हवामान थंड व कोरडे राहील. आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ राहिल. कमाल तापमान २८-३१ डिग्री सें. व किमान तापमान १२-१५ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ४-८ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.
हवामान सतर्कता/इशारा:		**इशारा नाही**
सामान्य सल्ला		वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये भुरीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर उत्पादनाचा दर्जा घटण्यासोबतच उत्पन्नामध्येही घट येते. प्रतिबंधात्मक उपाययोजना हीच भुरी नियंत्रणाची सर्वांत योग्य पद्धत आहे. एकदा आलेली भुरी नियंत्रित करण्यास अवघड असते. यासाठी वेलींचे सतत निरीक्षण करणे महत्त्वाचे आहे. व्यवस्थापन रोग प्रतिबंधक जातींची लागवड करावी. नत्र अन्नद्रव्याच्या अति वापराने भुरीची तीव्रता वाढते. तर पालाश अन्नद्रव्यामुळे पिकाची आंतरिक रोग प्रतिकारक्षमता वाढून, रोगाची तीव्रता कमी होते. यासाठी अन्नद्रव्यांचा संतुलित मात्रेत वापर करावा. दाटीवाटीने वाढलेल्या पिकामध्ये रोग प्रसारासाठी अनुकूल सूक्ष्म हवामान बनते व रोगाची तीव्रता वाढते. यासाठी पिकाच्या ओळींमध्ये हवा खेळती राहील, अशाप्रकारे रोपांची संख्या ठेवावी. भुरी रोगाच्या प्रतिबंधासाठी हवामानानुसार ८ ते १० दिवसांच्या अंतराने, मेट्रिलड्रीनोकॅप (३७.५ ईसी) ०.७ मि.ली. किंवा हेक्झाकोनॅझोल (५ ईसी) १ मि.ली. किंवा डायफेनोकोनॅझोल (२५ ईसी) ०.५ मि.ली. प्रति लिटर पाणी प्रमाणे फवारणी करावी. भाजीपाला पिकांवरील फुलकिडींचे नियंत्रणासाठी फिप्रोनिल १५ मिली प्रति १० लि पाण्यात मिसळुन फवारणी करावी. रोपवाटीकेतील वांगी, मिरची, टमाटे इ. भाजीपाला रोपांच्या जोमदार वाढीसाठी पेरणीनंतर १५ दिवसांनी प्रती वाफा ५० ग्रॅम युरिया खताची मात्रा द्यावी. भाजीपाला रोपे पुनर्लागवड करावयाच्या शेतामध्ये जमीन वाफसा स्थितीत असताना मशागतीचे कामे सुरु करावीत.
संदेश		**जनावरांसाठी लिव्हर फ्लूक रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारीसल्ल्याने सर्व जनावरांना जंताचे औषध द्यावे.**
रब्बी ज्वारी	वाढीची अवस्था	कीड नियंत्रण खोडमाशी प्रादुर्भाव पिकाच्या बाल्यावस्थेत दिसून येतो. पोंगेमर होऊन झाडाला जमिनीलगत फुटवे फुटतात. नियंत्रण (फवारणी प्रतिलिटर पाणी) १०% अंडी असलेली झाडे/ १०% पोंगेमर झालेली झाडे आढळल्यास, सायपरमेथ्रीन (१० ईसी) २ मिली किंवा डेल्टामेथ्रीन (२.८ ईसी) १.२५ मिली किंवा क्विनॉलफॉल (२५ ईसी) २ मिली किंवा क्लोरपायरीफॉस (२० ईसी) २.५ मिली खोडकिडा प्रादुर्भाव पिकाची बाल्यावस्था ते पक्व अवस्थेत दिसून येतो. पानांवर एका सरळ रेषेत छिद्रे, पोंगेमर दिसून येते. कणीस मधून फाटते. नियंत्रण (फवारणी प्रतिलिटर पाणी) १०% झाडांच्या पानावर छिद्रे/ ५% पोंगेमर झालेली झाडे आढळल्यास, क्विनॉलफॉस (२५ ईसी) २ मिली किंवा क्लोरपायरीफॉस (२० ईसी) २.५ मिली
गहू	मुकुटमुळे फुटण्याची ते नवीन फुटवे अवस्था	बागायती उशिरा पेरणी बागायती गव्हाच्या वेळेवर पेरणीसाठी नोव्हेंबर महिन्याचा पहिला पंधरवडा ही शिफारस असली, तरी ऊस तोडणीनंतर, तसेच खरीप पिकांच्या काढणीस उशीर होण्याने गहू पिकाची लागवड उशिरा करावी लागते. बागायत गव्हाच्या उशिरा पेरणीची शिफारस ही १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीसाठी आहे. मात्र, काही ठिकाणी १५ डिसेंबरनंतरही गव्हाची पेरणी केली जाते. वास्तविक १५ नोव्हेंबरनंतर पेरणी केलेल्या प्रत्येक उशिराच्या पंधरवड्यात गव्हाची पेरणी केल्याने एकरी १ क्विंटल उत्पादन कमी मिळते. गव्हाच्या बागायती उशिरा पेरणीसाठी एनआयएडब्लू-३४, एकेएडब्लू-४६२७, फुले समाधान (एनआयएडब्लू-१९९४) या जातींची निवड करावी. एकरी ५० ते ६० किलो बियाणे वापरावे. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम कॅप्टन किंवा थायरमची प्रक्रिया करावी. त्यानंतर १५ मिनिटांनी प्रति दहा किलो बियाण्यास २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर आणि २५० ग्रॅम पीएसबी जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. बागायती उशिरा पेरणीसाठी दोन ओळीत १८ सेंमी अंतर ठेऊन रासायनिक खतांच्या पहिल्या हप्त्यासह दोन चाड्याच्या पाभरीने पेरणी करावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. पेरणी दक्षिणोत्तर करावी. गव्हाची पेरणी उभी-आडवी न करता, एकेरी करावी. म्हणजे आंतरमशागत करणे सोपे जाते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा, म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद आणि ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सारे पाडावेत.
हरभरा	वाढीची अवस्था	जोमदार वाढीसाठी पीक सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवावे. तसेच पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली व ३० दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. कोळपणी शक्यतो वापशावर करावी. कोळपणीमुळे जीमिनीत हवा चांगली खेळती राहते आणि पिकाची वाढ चांगली होते. कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी खुरपणी करावी. यासाठी गरजेनुसार एक किंवा दोन खुरपण्या वेळीच कराव्यात. मजुरांअभावी खुरपणी करणे शक्य नसल्यास, जमिनीत पुरेसा ओलावा असताना पेरणीनंतर लगेचच पेंडिमिथॅलिन (३० ईसी) या तणनाशकाची १ ते १.२ लिटर प्रति एकरी २०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
भात	पीक पक्वतेची अवस्था /कापणी/ मळणी अवस्था	हवामानाच अंदाज लक्ष्यात घेता पिक पक्व होताच लवकरात लवकर काढणी पूर्ण करावी.यंत्राच्या सहाय्याने कापणी केल्यास वेळेत व खर्चातही बचत होऊ शकते. कापलेला भात वाळण्यासाठी १-२ दिवस पसरून ठेवावा व नंतर मळणी करावी. चांगला उतारा मिळण्यासाठी मळणीयंत्र वापरावे. दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के होईपर्यंत भात वाळवावा. नंतर वाळवून कोरड्या, स्वच्छ व सुरक्षित जागी धान्याची साठवण करावी.
नाचणी/नागली व वरई	कापणी / मळणी	हवामानाच अंदाज लक्ष्यात घेता पिक पक्व होताच लवकरात लवकर काढणी पूर्ण करावी. विविध वाणानुसार पक्वता कालावधी वेगळा असू शकतो. साधारणपणे १०० ते १२० दिवसात पिक काढणीस सुरुवात करावी. काढणीस उशीर झाल्यास बोंडातील दाणे झडण्याची शक्यता असते. पिक पक्व होताच लवकरात लवकर काढणी करावी. पिकांची काढणी कणसे खुडून किंवा जमिनीबरोबर कापणी करावी. कणसे चांगली वाळल्यानंतर कणसे बडवून मळणी करावी. धान्य स्वच्छ करून उन्हात चांगले वाळवून हवेशीर जागी साठवण करावी.
खुरासणी	कापणी / मळणी	हवामानाच अंदाज लक्ष्यात घेता पिक पक्व होताच लवकरात लवकर काढणी पूर्ण करावी. पाने पिवळी पडून वाळणे व बोंडे तपकिरी किंवा काळी पडणे ही कापणीची लक्षणे आहेत. बोंडे पूर्ण वाळून तडकण्यापूर्वीच कापणी करावी. दाणे गळणे टाळण्यासाठी पहाटे किंवा सकाळी ओलावा असताना कापणी करावी. पीक जमिनीलगत कापून लहान पेंढ्या बांधून ताडपत्रीवर किंवा स्वच्छ जागी गोळा कराव्यात.
द्राक्ष		द्राक्ष बागेत बागेला गोणपाट किंवा सावलीनेट किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षणकरावे. थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे. भुरी नियंत्रण फळधारणेच्या अवस्थेतील बागांमध्ये प्रादुर्भाव टाळण्यासाठी, सल्फर २ मि.ली किंवा ॲपिलोमायसेस क्रिसक्रॅलिस ६.८ मि.ली प्रति लिटर पाणी याप्रमाणे

हवामान आधारीत कृषि सल्ला
ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ **ईमेल:igatpuri.amfu@gmail.com**

द्राक्ष		फवारणी करावी. अद्यापही फळधारणा न झालेल्या बागांमध्ये, फ्लुओपायरम (२०० एससी) + टेब्युकोनॅझोल (२०० एससी) (संयुक्त बुरशीनाशक) ०.५६३ मि.ली किंवा सायफ्लुफेनामीड (५ ईडब्ल्यू) ०.५ मि.ली किंवा फ्लुक्सापायरॉक्साड (७५ हध्स) + डायफेनोकोनॅझोल (५० हध्स एससी) (संयुक्त बुरशीनाशक) ०.८ मि.ली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. फळछाटणीनंतर ६० दिवसांपूर्वीची स्थिती असलेल्या बागेत ट्रायझोल वर्गातील हेक्झाकोनॅझोल (५ एससी) १ मि.ली किंवा डायफेनोकोनॅझोल ०.७ मि.ली किंवा पॉलिऑक्सिन डी झिंक सॉल्ट (५ एससी) ०.६ मि.ली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घेता येईल. ६०-९० दिवसांच्या कालावधीतील बागेमध्ये, सल्फर २ ग्रॅम अधिक कॅल्शिअम क्लोराईड १.२ ग्रॅम प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. मण्यात पाणी उतरल्यानंतरच्या अवस्थेतील बागेत सल्फर २ ग्रॅम अधिक कॅल्शिअम नायट्रेट १.२ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. ॲपिलोमायसेस क्विसकॅलिस हे जैविक बुरशीनाशक भुरीविरुद्ध प्रभावी काम करते. त्यामुळे याचा नियमितपणे वापर चालू ठेवावा. फळधारणेनंतर भुरीचा अधिक प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आल्यास, मेट्राफेनोन (५० एसी) ०.२५ मि.ली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. (फवारणीपूर्वी राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे / कांदा व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत यांच्या शिफारशीत माहिती नुसार काढणीपूर्व कालावधी अंतर पडताळून पाहणे अत्यंत आवश्यक आहे.)
डाळिंब		डाळिंब बागेत बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षणकरावे. थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे. अधिक आर्थिक फायद्यासाठी ४.५ X ३.० मी. अंतरावर लागवड केलेल्या डाळींबामध्ये ठिबक सिंचनाने झाडाजवळचे २० % क्षेत्र पाण्याने ओलीताखाली येणे योग्य असते. त्यापेक्षा अधिक क्षेत्र ओलीताखाली आल्यास बागेत सूक्ष्म हवामान तयार होऊन खोडाला लहान छिद्रे पाडणारे भुंगेरे व मर रोग यांचा प्रादुर्भाव वाढतो. खोडकिडीचा जास्त प्रादुर्भाव असणाऱ्या क्षेत्रामध्ये डाळींबाला हलक्या जमिनीत चार खोडे ठेवून वळण देणे योग्य ठरते.
आंबा		गावठी व अनुत्पादक झाडाचे सुधारित जातींमध्ये रुपांतर करण्यासाठी, आंब्याची झाडे नोव्हेंबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये जमिनीपासून २ मी. उंचीवर छाटून, फांदीवरील नवीन फुटव्यांवर अनुक्रमे फेब्रुवारी ते मार्च या महिन्यामध्ये केशर वाणाचे पाचर कलम करावे.
कांदा	रोपवाटिका / पुनर्लागवड	रब्बी कांदा पिकाच्या रोपवाटिकेत तण नियंत्रण व जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी निंदनी व खुरपणी करावी. रब्बी हंगामाचा कांदा पुनर्लागवडीपूर्वी १५ दिवस अगोदर गंधक हेक्टरी ४५ किलो या प्रमाणात जिप्सम किंवा गंधकाच्या स्वरूपात मातीत मिसळावे. सद्य स्थितीत कांदा पिकात ढगाळ हवामानामुळे पर्ण करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढू शकतो. तरी पर्ण करपा करपा रोगाच्या नियंत्रणासाठी साफ बुरशीनाशकाची २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
टोमॅटो		तण नियंत्रण टोमॅटो पुनर्लागवडीनंतर आवश्यकतेनुसार खुरपण्या करून पीक तणविरहित ठेवावे. टोमॅटोच्या पिकात तणनाशकाचा वापर करावयाचा झाल्यास, रोपांच्या पुनर्लागवडीपूर्वी कोरड्या वाफ्यात पेंडिमिथॅलिन (३० ईसी) १ लिटर प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. फवारणीनंतर पाणी देऊन पुनर्लागवड करावी. अन्यथा पुनर्लागवडीनंतर १६ ते २० दिवसांनी मेट्रीब्यूझीन (७० डब्ल्यूपी) या तणनाशकाची ३०० ग्रॅम प्रति एकर या प्रमाणात नॅपसॅक पंपाने फ्लॅट फॅन किंवा फ्लड जेट नोझल वापरून तणांवर फवारणी करावी. फवारणीवेळी जमिनीत पुरेसा ओलावा असावा.
पशुधन (गाय व म्हैस)		जनावराना रात्री गोठ्यात ठेवावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा कारडा ठेवावा. लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे सध्याच्या थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान / शेडनेटचे पडदे लावावेत. तसेच गोठ्यामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोट्या जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषत: गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. टंचाईग्रस्त परिस्थितीत पशुधनाचे संगोपन दुभत्या जनावरांसाठी पुरेसे पशुखाद्य आणि संपूर्ण ऊसाचा हिरवा चारा म्हणून वापर करावा. वैरण उपलब्ध नसल्यास मक्याचा कडबा किंवा वाळलेले गवत, भाताचा पेंडा इत्यादी चाऱ्याची कुट्टी करुन त्यावर २ टक्के मिठाचे द्रावण शिंपडून जनावरांना खाऊ घालावे. भाजीपाला बाजारसमितीच्या आवारातील भाजीपाल्याचे अवशेषाचा शक्य तेवढा चारा म्हणून वापर करावा.
शेळी		रात्रीच्या वेळी थंडी वाढत असल्याने छोटी करडे, कोकरे यांना निवारा करावा. करडांची संख्या जास्त असल्यास गोठ्यामध्ये करडांना ऊब लागेल अशा उंचीवर २०० ते ५०० वॅटचे बल्ब लावावेत. शेळ्या-मेंढ्यांचे चारा व्यवस्थापन वर्षभर चारा उपलब्ध होण्यासाठी स्वतःच्या शेतात विविध चारा पिकांची लागवड करावी. शेळ्या-मेंढ्यांना शारीरिक अवस्था व गरजेनुसार हिरवा चारा, वाळलेला चारा, २००-३०० ग्रॅम खुराक व खनिज मिश्रण द्यावे. गाभण शेळ्यांना विशेषतः शेवटच्या ५० दिवसांत गर्भाच्या योग्य वाढीसाठी अतिरिक्त चारा व पोषण द्यावे. मूग, तूर, हरभरा यांचे भुस, उन्हाळी भुईमूग पाला तसेच बाभूळ, सुबाभूळ, अंजन, कडुलिंब आदी झाडांचा पाला चाऱ्यासाठी वापरावा. चारा गव्हाणीतून द्यावा, चाऱ्याची नासाडी टाळावी व उरलेल्या चाऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करावे. शेळ्या-मेंढ्यांना दिवसभर स्वच्छ व पुरेसे पिण्याचे
कुक्कुटपालन		हवामानाच अंदाज लक्ष्यात घेता, कुक्कुटपालनात, शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन पिल्ले गरम ठेवा. अंडी देणाऱ्या कोंबड्यांसाठी चोची कापणे व रोग प्रतिबंधक लस टोचणी कार्यक्रम पक्षाचे वय / प्रतिबंधक लस / लस टोचण्याची पद्धत १ दिवस / मॅरेक्स / पायाच्या स्नायुमध्ये (उबवणी केंद्रामध्ये) ५ ते ७ दिवस / लासोटा (एफ.वन) / नाकातून अथवा डोळ्यातून १ थेंब ७ दिवसानंतर / चोची कापणे / आधी वरची व खालच्या चोचीचा शेंडा कापणे ७ ते १४ दिवस / गंबोरो / डोळ्यातून देणे ४ था आठवडा / इनफेक्ट्सिस ब्रॉंकायटिस / डोळ्यात एक थेंब टाकणे ५ वा आठवडा / लासोटा / पिण्याच्या पाण्यातून देणे ८ वा आठवडा / देवीची लस / पायाच्या मांसल भागात १० वा आठवडा / रानीखेत लस (आर.बी.) / पायाच्या मांसल भागात १० ते १२ आठवडे / चोची कापणे / वाढलेल्या चोची कापणे व तो भाग वाढू देऊ नये १८ वा आठवडा / रानीखेत लस (लासोटा) / पाण्यातून देणे सूचना : वरील प्रतिबंधक लस टोचल्यानंतर ३ दिवस व्हिटॅमिन मिश्रण पाण्यातून अगर खाद्यातून द्यावे. त्यामुळे कोंबड्यांना लस टोचण्याचा ताण कमी होईल व कोंबड्या नेहमीप्रमाणे राहतील. सरासरी २ ते ३ महिन्यानंतर एकदा जंताचे औषध पाजावे.

स्त्रोत:

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र,मुंबई.

२) मागील हवामान: ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

ठिकाण : विकृसंके,इगतपुरी
दिनांक : २३.११.२०२६

स्वाक्षरीत/-
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी
तथा सहयोगी संशोधन संचालक,
वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक